बृहन्मुंबईतील घोडागाडी मालकांकडील घोड्यांचे पुनर्वसनाची संपूर्ण प्रक्रिया होईपर्यंत घोड्यांच्या जिवीताची सुरक्षा व आरोग्याची जपवणूक होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः पविआ-१०१७/प्र.क्र.१३४/पदुम-३
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- ०७ एप्रिल, २०१८

<u>वाचा</u>:- (१) शासन निर्णय गृह विभाग क्र. न्यायाप्र-१०१५/प्र.क्र.३७९/पोल-८, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६.
(२) शासन निर्णय गृह विभाग क्र. न्यायाप्र-१०१५/प्र.क्र.३७९/पोल-८, दिनांक १६ जून, २०१७.

<u>प्रस्तावना</u>:-

ॲनिमल ॲण्ड बर्ड चॅरिटेबल ट्रस्ट व इतर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर यांच्याविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ३६ / २०११ दाखल केलेली होती. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक ८ जून, २०१५ रोजी पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सर्वंकष अभ्यास करण्यासाठी गृह विभागाने संदर्भाधीन दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मंत्रिमंडळ उपसमिती गठीत केली होती. सदरहू मंत्रिमंडळ उपसमितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन, बृहन्मुंबईतील घोडागाडी व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या चालक / मालक त्याचप्रमाणे घोड्यांच्या पुनर्वसनाबाबत संदर्भाधीन दिनांक १६ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित केलेले आहेत.

२. उक्त दिनांक १६ जून, २०१७ च्या शासन निर्णयामधील मुद्दा क्र. २ मध्ये खालीलप्रमाणे आदेश निर्गमित केलेले आहेत.

"घोड्यांच्या पुनर्वसनासाठी संबंधित घोडेमालकांनी घोड्यांची विक्री करावी अथवा सदर घोड्यांचा सांभाळ करण्यास इच्छूक असलेल्या स्वयंसेवी संस्थेस हे घोडे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घोडागाडी मालकांच्या संमतीने सुपूर्द करण्यात यावेत. याबाबतची संपूर्ण कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेने करावी. **तसेच या संपूर्ण प्रक्रियेत घोड्याच्या जिवीताची सुरक्षा व आरोग्याची जपवणूक होण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन विभागाने समग्र धोरण योजना आखण्यास मंजूरी देण्यात येत आहे.**"

३. गृह विभागाच्या वरील निर्णयाच्या अनुषंगाने बृहन्मुंबईतील घोडागाडी मालकांकडील घोड्यांचे वरीलप्रमाणे पुनर्वसनाची संपूर्ण प्रक्रिया होईपर्यंत घोड्याच्या जिवीताची सुरक्षा व आरोग्याची जपवणूक होण्याच्या दृष्टीने धोरण ठरविण्याच्या बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

४. वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन सदर शासन निर्णयाद्वारे खालीलप्रमाणे धोरणास शासन मान्यता देत आहे.

(i) बृहन्मुंबईतील घोडागाडी मालकांकडील घोड्यांचे वरीलप्रमाणे पुनर्वसनाची संपूर्ण प्रक्रिया होईपर्यंत घोड्याच्या जिवीताची सुरक्षा व आरोग्याची जपवणूक होण्याच्या दृष्टीने आवश्यकती उपाययोजना प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, मुंबई विभाग, मुंबई यांनी तात्काळ प्रभावाने करावी.

(ii) यासंदर्भात प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, मुंबई विभाग, मुंबई यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी तसेच पोलीस सहआयुक्त (वाहतूक), बृहन्मुंबई यांच्याशी समन्वय साधून घोडे कोणत्या ठिकाणी आहेत, याबाबतची एकत्रित पाहणी करुन, संपूर्ण माहिती प्राप्त करुन घ्यावी.

त्यानुसार घोड्यांच्या जिवीताची सुरक्षा व आरोग्याची जपवणूक होण्याच्या दृष्टीने प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, मुंबई विभाग, मुंबई यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर सदर कामाच्या जबाबदाऱ्या सोपवाव्यात.

(iii) सदर कामासाठी आवश्यकतेप्रमाणे बृहन्मुंबईतील पशुवैद्यकीय महाविद्यालये तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील पशुवैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांची मदत घ्यावी. पशुवैद्यकीय सेवा सत्वर उपलब्ध होण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तसेच पशुवैद्यकीय महाविद्यालयांचे दवाखान्यात उपलब्ध सुविधांचा वापर करण्यात यावा.

(iv) बृहन्मुंबईतील घोड्यांच्या पुनर्वसन प्रक्रियेत घोडागाडी व्यवसायिकांकडून घोड्यांचा ताबा महानगरपालिकेस देण्याकरीता पोलीस विभाग सहकार्य करील.

(v) प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, मुंबई विभाग, मुंबई यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व घोड्यांची आरोग्य तपासणी करुन सविस्तर अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर करावा.

५. सदरचा शासन निर्णय, गृह विभागाने दिनांक- १४.०८.२०१७ च्या आणि नगर विकास विभागाने दिनांक- ०८.०२.२०१८ टिप्पणीन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१०१३५७५७०००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran V Kurundkar

Digitally signed by Kiran V Kurundkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and ADF, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f89b7a82db2238fb7337a9a9b8e00b9c1a35b509d1f6850ddcc783bdb12090f, cn=Kiran V Kurundkar
Date: 2018.04.10 17:42:42 +05'30'

(किरण कुरूंदकर)
सचिव (पदुम)

प्रत,

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई-३२.
४. प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई, मुंबई
८. सहपोलीस आयुक्त (वाहतूक), बृहन्मुंबई, मुंबई
९. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, मुंबई विभाग, मुंबई.
१०. प्रतिनिधी, ॲनिमल ॲण्ड बर्ड चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई.
११. प्रतिनिधी, पेटा (स्वंयसेवी संस्था)
१२. निवड नस्ती (पदुम-३)